ePaper
विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आजपासून, पहिल्याच दिवशी हायहोल्टेज घडामोडी?

| वर्ष - 7 । अंक -76 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www .mahaenews.com । सोमवार , दिनांक 17 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- फडणवीसांचे 'पंचामृत' दादांच्या हाती !
- वेस्ट इंडिजचा सुपडा साफ!
- पुणे मेट्रोचा दुसरा टप्पा लांबणीवर?
- मीना कुमारीचा बायोपिक

# थकबाकीदारांना 'अल्टिमेटम'!

## महापालिका प्रशासनाचा इशारा : मिळकतकर थकबाकीदारांवर 24 जुलैपासून जप्ती

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका करसंकलन व करआकारणी विभागाने ३० जूनपर्यंत संपूर्ण मिळकतकराचा भरणा केलेल्यांना १० ते २० टक्के करसवलत दिली. त्याचा तीन लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी लाभ घेतला. मात्र, अद्यापही ७३ हजार २०७ मिळकतधारकांकडे प्रत्येकी २५ हजार रुपयांहून अधिक थकबाकी आहे. ही एकूण रक्कम सातशे कोटींहून अधिक आहे. त्यांनी सात दिवसांत थकबाकी न भरल्यास २४ जुलैपासून जप्तीची कारवाई करण्याचा इशारा करसंकलन व करआकारणी विभागाने दिला आहे.**




मिळकतकर थकबाकी वसुलीसाठी एसएमएस, कॉलिंग, ध्वनिक्षेपक, होर्डिंग आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती केली. जप्ती पूर्व नोटीसही बजावल्या. थकबाकीदारांना कस्टमाईज मेसेज पाठविले होते. त्यामुळे सात हजार २७० मिळकतधारकांनी ६० कोटी ८८ लाख रुपयांचा करभरणा केला आहे. पण, काही मिळकतधारक वारंवार पाठपुरावा करून, आवाहन करूनही प्रतिसाद देत नसल्याने मालमत्ता जप्त करणे, त्यांचा लिलाव करणे, नळजोड खंडित करणे अशी कारवाई महापालिकेने सुरू केली आहे. २४ जुलैपासून जप्तीची मोहीम तीव्र केली जाणार आहे.

त्यासाठी नियुक्त केलेल्या पथकांमध्ये करसंकलन विभागाचे कर्मचारी, पाणी मीटर निरीक्षक, प्लंबर, मंडलाधिकारी, सहायक मंडलाधिकारी, एमएसएफ जवान आदींचा समावेश आहे. २५ हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या थकबाकीदारांना २१ जुलैपर्यंत नोटीस दिली जाणार असून २४ जुलैपासून जप्तीची कारवाई केली जाणार आहे.

### थकबाकीदारांची आकडेवारी...

- २५ हजारांपेक्षा अधिक रक्कम थकबाकीदारांची संख्या २९,१००
- ५० हजारांपेक्षा अधिक रक्कम थकबाकीदारांची संख्या ४४,१०७
- ७३ हजार २०७ मिळकतधारकांकडे ७६२ कोटी रुपये थकबाकी
- ५० हजार रुपयांच्या पुढील थकबाकीदारांची जप्ती अधिपत्रे



"पाणीपट्टी थकबाकी वसुलीसाठी या आर्थिक वर्षापासून मिळकतकर व पाणीपट्टी यांचे एकात्मिकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. गत वर्षीची प्रभावी कामगिरी बघून पाणीपट्टी वसुलीचे कामकाज करसंकलन विभागाकडे सोपविले आहे. एकूणच महापालिकेची करप्रणाली एकात्मिक, लोकाभिमुख, कार्यक्षम करणे आणि त्यातून महापालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. मालमत्ता जप्ती वा नळजोड तोडण्याची कारवाई टाळण्यासाठी मिळकतधारकांनी थकीत कर त्वरित भरून महापालिकेला सहकार्य करावे."

– **शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# लोणावळ्यातील भुशी धरणावर पर्यटकांची तुफान गर्दी...

## पर्यटकांचा वीकेंड आणि आखाड पार्टी : रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागल्यामुळे मोठी वाहतूक कोंडी

। लोणावळा । महाईन्यूज

**लोणावळ्यातील भुशी धरणावर विकेंड असल्याने पर्यटकांची तुफान गर्दी झाल्याचं बघायला मिळालं. आखाड पार्टीच नियोजन आणि विकेंड असल्याने लोणावळ्यात हजारो पर्यटक दाखल झाले होते...**

लोणावळ्यातील भुशी धरणावर विकेंड असल्याने पर्यटकांची तुफान गर्दी झाल्याचं बघायला मिळालं. आखाड पार्टीच नियोजन आणि विकेंड असल्याने लोणावळ्यात हजारो पर्यटक दाखल झाले होते. सहारा ब्रिज, टायगर पॉईंट, लायन्स पॉईंट या ठिकाणी पर्यटकांनी प्रचंड गर्दी केली होती. लोणावळ्यासह भुशी धरण आणि टायगर पॉईंट कडे जाणाऱ्या रस्त्यांवर वाहनांच्या रांगा बघायला मिळाल्या.

लोणावळा पर्यटनस्थळ म्हणून ओळखलं जातं. भुशी धरण, लाईन्स पॉईंट, टायगर पॉईंट या ठिकाणी पावसाळ्यात मुंबई, पुण्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक दाखल होतात. समाधानकारक पाऊस झाल्याने भुशी धरण ओसंडून वाहत आहे. तर इतरही छोटे- मोठे धबधबे वाहू लागले आहेत. सह्याद्रीच्या डोंगर रांगांवर हिरवा शालू परिधान केल्याचं भास सध्या होतो, कारण सर्वत्र हिरवळ दिसते. अनेक पर्यटक नियमांचे उल्लंघन करून डोंगर माथ्यावर चढतात. यामुळे पाय घसरून दुर्घटना होण्याची शक्यता असते.



### लोणावळा पोलिसांची दमछाक

: लोणावळ्यासह भुशी धरण टायगर आणि लायन्स पॉईंट कडे जाणाऱ्या रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली. सायंकाळच्या सुमारास सर्व पर्यटक लोणावळ्याच्या दिशेने निघाल्यानंतर वाहतूक कोंडीचे आणखी चित्र विदारक होते. पोलिसांनी अनेक ठिकाणी वाहतूक सुरळीत केली असली तरी प्रत्येक ठिकाणी पोलीस पोहोचणं अशक्य गोष्ट आहे. पर्यटकांचा वीकेंड आणि आखाड पार्टीचे नियोजन यामुळे लोणावळा पोलिसांची दमछाक झाली.

# पुणे-रायगडसाठी नवा मार्ग!

## खर्चासह वेळेची बचत होणार; रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर

### पुणे -रायगडला जोडणारा तिसरा पर्यायी मार्ग उपलब्ध

।पुणे/ जेजुरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**वेल्हे तालुक्यातील भोरडी ते महाड तालुक्यातील शेवते या नवीन रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे रायगडला जोडणारा हा तिसरा पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे. सध्या भोर तालुक्यातून वरंध आणि मुळशी तालुक्यातील ताम्हिणी घाटमार्गे रायगड जिल्ह्यात जाता येते. आता नव्याने वेल्हे तालुक्यातून रस्ता होणार असल्याने नागरिकांचा प्रवास सुखकर होणार आहे. गेली अनेक वर्षे वेल्ह्यातून महाडला जोडणारा रस्ता करावा, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू होते.**



सुरुवातीला या रस्त्यासाठी वेल्हे ते मढेघाट हा मार्ग निवडण्यात आला होता. त्याचे सर्वेक्षणदेखील झाले होते. मात्र, अतितीव्र चढ-उतार, नागमोडी वळणे, खडक व टेकड्यांचा भूभाग असल्याने नैसर्गिक परिस्थिती प्रतिकूल होती. याशिवाय तांत्रिकदृष्ट्या काम करणे अतिशय खडतर होते. एवढेच नाही, तर भविष्यात वाहतुकीसाठी हा मार्ग धोकादायक, त्रासदायक होऊ शकतो, असेही समोर आले. यामुळे नव्याने भोरडी, पिशवी, गुगुळशी, पांगारी ते शेवते (रायगड) हा पर्यायी रस्ता आमदार संग्राम थोपटे यांनी सूचवला. संबंधित विभागाने त्याची पाहणी करून अहवाल राज्य सरकारकडे पाठवला. त्यानुसार तेरा किलोमीटरच्या या रस्त्याला मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोनमधून पंचवीस कोटी ३२ लाख रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे आमदार थोपटे यांनी सांगितले.

वेल्हे ते भोरडी फाटा ते शेवते हा १८ किलोमीटर लांबीचा रस्ता आहे. यातील १३ किलोमीटर लांबीच्या रस्त्याला मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मान्यता मिळाली आहे. यापूर्वी अर्थसंकल्पीय अधिवेशनात २.८ किलोमीटर रस्त्याच्या कामासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामध्ये सपाटीकरण करून साडेसात मीटर डांबरीकरण रस्ता, पाच ठिकाणी पाइप टाकण्यात येणार असल्याचे वेल्हे सार्वजनिक बांधकाम विभागाने सांगितले. उर्वरित २.२ किलोमीटरच्या रस्त्याचा प्रस्ताव संशोधन व विकास (आर अँड डी) विभागाकडे पाठवला आहे. त्या कामासाठी चार कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. नवीन मार्ग हा कमी अंतराचा होणार असल्यामुळे पुण्यातून महाड, रायगडला जाण्यासाठी प्रवासाचा वेळे वाचणार असून, इंधन आणि पैशांचीही बचत होणार आहे; तसेच या मार्गावरील पर्यटनालाही अधिक चालना मिळणार आहे. या कामात रस्त्याकडेला गटारे, साइडपट्ट्यांसह साडेसात मीटर रुंदीचा डांबरीकरण रस्ता करण्यात येणार आहे. कठीण खडकामुळे (हार्ड रॉक) पिशवी गावाजवळ साडेतीनशे मीटर कॉक्रिटीकरण करण्यात येणार आहे. गुगुळशी व पांगारी येथे साडेसात मीटर रुंद व पंधरा मीटर लांबीचे दोन पूल उभारण्यात येणार आहेत. त्यातील एक पूल सात आणि दुसरा पाच मीटर उंच आहे. या मार्गात १४ मोठ्या मोऱ्या आणि १०० मीटरची ‘रिटर्निंग वॉल’ बांधण्यात येणार आहे.

### सर्वंकष वाहतूक आराखड्यात सुधारणा

**पुणे ते रायगड जिल्ह्यातील महाडला जाण्यासाठी भोर-वरंध मार्ग १४० किलोमीटर रस्ता आहे. मुळशी तालुक्यातील ताम्हिणी घाटमार्गे महाड १६० किलोमीटर आहे. नव्याने होणारा भोरडी, शेवतेमार्ग १२० किलोमीटर लांबीचा असल्याने २० ते ४० किलोमीटरचा फेरा वाचणार आहे.**

# कर्ज काढायला प्रवृत्त केले; १५ लाखही घेतले

## फसवणूक झालेल्या आयटी इंजिनिअरने उचललं टोकाचं पाऊल





। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील खराडी परिसरातील संगणक अभियंता तरुणाने आर्थिक फसवणूक झाल्याने आत्महत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी चार जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.**

गुंतवणुकीत फसवणूक झाल्याने खराडी भागातील एका संगणक अभियंता तरुणाने इमारतीवरून उडी मारून आत्महत्या केली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अष्टविनायक फर्म या गुंतवणूक सल्लागार संस्थेच्या सल्लागारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रभात शंभूप्रसाद रंजन (वय ४६, रा. विठ्ठलनगर, खराडी) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी अष्टविनायक फर्मचे संचालक सेल्वा नाडर, प्रसाद शिंदे, सचिनकुमार, अजिंक्य लोखंडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राजीव शंभूप्रसाद रंजन (वय ४८,रा. झारखंड) यांनी चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

प्रभात रंजन एका माहिती-तंत्रज्ञान कंपनीत नोकरीस होते. त्यांनी १३ जुलैला पहाटे पावणेचारच्या सुमारास आत्महत्या केली. त्यांनी लिहिलेल्या चिठ्ठीत फसवणूक झाल्याने आत्महत्या करीत असल्याचे नमूद केले आहे. सेल्वा नाडर, प्रसाद शिंदे यांनी प्रभात रंजन यांना विविध बँकांकडून ९० लाख रुपयांचे कर्ज काढण्यास प्रवृत्त केले होते. जुलै २०२१मध्ये त्यांनी कर्ज काढले. त्यानंतर अष्टविनायक फर्मने कार्यालय बंद केले.

सचिनकुमारने गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या आमिषाने १५ लाख रुपये घेतले होते. प्रभात रंजन यांची महागडी कार अजिंक्य लोखंडेने साडेसात लाख रुपयांना खरेदी केली होती. या व्यवहारातील साडेचार लाख रुपये दिले नव्हते.

अष्टविनायक फर्मचे संचालक, आणि त्यांच्या साथीदारांनी प्रभात यांची एक कोटी १७ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे प्रभात रंजन यांचे भाऊ राजीव रंजन यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

# वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर

।पुणे। महाईन्यूज ।।

देशातील अखिल भारतीय वैद्यक विज्ञान संस्था ( एम्स), अभिमत विद्यापीठे, केंद्रीय विद्यापीठांसह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये एमबीबीएस, बीडीए, आणि बीएससी नर्सिंग या अभ्यासक्रमासाठी अखिल भारतीय १५ टक्के कोट्यातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना येत्या २० जुलैपासून ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करता येणार आहे.

वैद्यकीय समुपदेशन समितीने (एमसीसी) प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले असून, पहिल्या फेरीसाठीची नोंदणी प्रक्रिया २० जुलैपासून सुरू होणार आहे. वैद्यकीय प्रवेशांसाठी एकूण तेरा भारतीय भाषांतून नीट प्रवेश परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षा दिलेल्या एकूण २० लाख ३६ हजार ३१६ विद्यार्थ्यांपैकी ११ लाख ४५ हजार ९७६ विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. समुपदेशन समितीकडून अखिल भारतीय १५ टक्के कोट्याअंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबवली जाते, तर उर्वरित ८५ टक्के जागांवर प्रवेशासाठी संबंधित राज्यांतील यंत्रणेकडून प्रवेश दिले जातात. अखिल भारतीय कोट्यासाठीची प्रक्रिया २० जुलैपासून सुरू होणार आहे. पहिल्या फेरीसाठी २० ते २५ जुलै या कालावधीत नोंदणी करता येणार आहे. समुपदेशनाच्या पहिल्या फेरीची निवड यादी २९ जुलै रोजी जाहीर करण्यात येईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ३१ जुलै ते ४ ऑगस्ट दरम्यान वैद्यकीय संस्थांमध्ये आवश्यक कागदपत्रे जमा करावी लागतील. दुसरी फेरी ९ ते ३० ऑगस्ट दरम्यान होणार आहे, तर तिसरी फेरी ३१ ऑगस्ट ते २० सप्टेंबर या कालावधीत होईल.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दुर्लक्षामुळे
# पवनामाईची लागली वाट!

## » संबंधितांवर कठोर कारवाईची खासदार श्रीरंग बारणे यांची मागणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराची जीवनवाहिनी म्हणून ओळख असलेली पवना नदी रविवारी (दि. 16) पुन्हा फेसाळली. एकीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नदी सुधार प्रकल्प हाती घेतले आहेत. तर दुसरीकडे महापालिकेचे ढिम्म प्रशासन नदी सुधार बाबत कुठलीही कार्यवाही करत नसल्याने पवनामाईची पुरती वाट लागली आहे. त्यामुळे पवना नदीच्या प्रदुषणासाठी कारणीभूत असलेल्या संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे.**



खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, “थेरगाव येथील केजुदेवी बंधारा ते चिंचवडगावातील श्री मोरया गोसावी घाट या दरम्यान पवना नदी मोठ्या प्रमाणात फेसाळली. शहरातील ड्रेनेजचे पाणी कुठलीही प्रक्रिया केल्याशिवाय थेट नदीत सोडले जाते. तसेच रसायन मिश्रित पाणी देखील नदीत मिसळले जाते.

यामुळे पवना नदीची दुरवस्था झाली आहे. जलपर्णी वाढणे, पाण्यावर फेस येणे; हे प्रकार सातत्याने सुरु आहेत. नदीचे आरोग्य बिघडल्याने त्याचा परिणाम शहरवासीयांच्या आरोग्यावर देखील होणार आहे.

नदीत थेट ड्रेनेजचे आणि केमिकल मिश्रित पाणी सोडले जाऊ नये याबाबत यापूर्वी अनेकदा तक्रारी करण्यात आल्या आहेत. नदी प्रदूषित होण्याच्या कारणांच्या तळाशी जाऊन यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. मात्र महापालिका प्रशासन असे करताना दिसत नाही. पालिका आयुक्त आणि अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने ही परिस्थिती ओढवली आहे.

पवना नदी प्रदूषित झाल्याने नदीतील मासे आणि इतर जलचर प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होत आहे. भर पावसाळ्यात देखील नदी फेसाळण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे याबाबत महापालिकेने ठोस उपाययोजना कराव्यात. तसेच संबंधितांवर कठोर कारवाई कारवाई, असेही खासदार श्रीरंग बारणे म्हणाले.

### जलचर प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू

**» जलपर्णी वाढणे, पाण्यावर फेस येण्याचे प्रकार सातत्याने सुरु आहेत. नदीचे आरोग्य बिघडल्याने त्याचा परिणाम शहरवासीयांच्या आरोग्यावर देखील होणार आहे. नदीत थेट ड्रेनेज आणि केमिकल मिश्रित पाणी सोडले जाऊ नये याबाबत यापूर्वी अनेकदा तक्रारी करण्यात आल्या आहेत. नदी प्रदूषित होण्याच्या कारणांच्या तळाशी जाऊन यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. मात्र महापालिका प्रशासन असे करताना दिसत नाही. आयुक्त आणि अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने ही परिस्थिती ओढवली आहे. पवना नदी प्रदूषित झाल्याने नदीतील मासे आणि इतर जलचर प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होत आहे. भर पावसाळ्यात देखील नदी फेसाळण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे याबाबत महापालिकेने ठोस उपाययोजना कराव्यात. तसेच संबंधितांवर कठोर कारवाई कारवाई, अशी मागणी श्रीरंग बारणे यांनी केली आहे."**

---

# चिंचवड मतदारसंघात "टिफिन बैठक" उत्साहात

## » भाजपाचे निमंत्रित सदस्य शंकर जगताप यांचा पुढाकार

**» "मोदी@9 महा-जनसंपर्क अभियानाची" मतदार संघात प्रभावी अंमलबजावणी**

**» कल्याणकारी योजना तळागाळात पोहोचवण्याचा संकल्प**

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीतर्फे "मोदी@9 महा- जनसंपर्क अभियान" प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत टिफिन बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या यशस्वी कामगिरीसाठी "मोदी@9महा-जनसंपर्क अभियान" राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून चिंचवड विधानसभा मतदारसंघ अंतर्गत समीर लॉन्स, रावेत येथे "टिफिन बैठक" आयोजित करण्यात आली.**



भाजपा निमंत्रित सदस्य तथा माजी नगरसेवक शंकर जगताप याच्या पुढाकाराने ही "टिफिन बैठक" घेण्यात आली. यावेळी आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप, माजी महापौर माई ढोरे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, सदस्य महाराष्ट्र प्रदेश भाजपा अजित कुलथे, शहराध्यक्ष सांस्कृतिक आघाडी भाजपा धनंजय शाळीग्राम , चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा उज्वला गावडे ,भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष संकेत चोंधे, भाजपा सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, मंडलअध्यक्ष योगेश चिंचवडे, नगरसेवक राजेंद्र गावडे, बाबासाहेब त्रिभुवन, अभिषेक बारणे, सुरेश भोईर, संतोष कांबळे, सागर आंघोळकर, विनायक गायकवाड, सिद्धेश्वर बारणे, जिल्हा नियोजन समिती सदस्य काळूराम नढे, माजी नगरसेविका अश्विनी चिंचवडे, नीता पाडळे, मोनाताई कुलकर्णी, मनीषा पवार, आरतीताई चोंधे, उषा मुंढे, जिल्हा नियोजन समिती सदस्य भारती विनोदे, स्वीकृत सदस्य विनोद तापकीर, महेश जगताप, संदीप नखाते, गोपाळ माळेकर, संदीप गाडे, विठ्ठल भोईर, विभिषण चौधरी, भाजप जिल्हा उपाध्यक्ष शेखर चिंचवडे, रवींद्र देशपांडे सामाजिक कार्यकर्त्या करिष्मा बारणे, कुंदा भिसे, कविता दळवी, सामाजिक कार्यकर्ते तानाजी बारणे, गणेश कस्पटे, नवनाथ ढवळे, सखाराम रेडेकर, संतोष ढोरे, सखाराम नखाते, सनी बारणे, अजय दूधभाते, शिवाजी कदम, संजय भिसे, प्रमोद पवार, प्रकाश लोहार, आप्पा ठाकर, कैलास सानप, दिलीप तनपुरे, प्रसाद कस्पटे, दिगंबर गुजर, रणजित कलाटे, दीपक भोंडवे, रमेश काशीद, जवाहर ढोरे, युवराज ढोरे, संकेत कुटे, सरचिटणीस चिंचवड किवळे मंडल रवींद्र प्रभुणे तसेच भाजपा पदाधिकारी, माजी नगरसेवक, नगरसेविका शक्तीकेंद्र प्रमुख, बूथप्रमुख, पेज प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजना व महत्त्वाकांक्षी निर्णय सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प यानिमित्ताने केला आहे. शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या नागरिकांचा आणि विद्यार्थ्यांचा सत्कार देखील करण्यात आला. तसेच वाढदिवसानिमित्त शाल आणि पुस्तक देऊन अभिष्टचिंतन केले. ती बैठक अत्यंत आपुलकीची आणि उत्साहाची झाली.
> **- शंकर जगताप, निमंत्रित सदस्य तथा माजी नगरसेवक, भाजपा.**




# फार्मासिस्टविना औषध दुकाने !



**जून महिन्यात झारखंडच्या मुख्यमंत्र्यांनी एक घोषणा केली, “ज्याला लिहिता-वाचता येते, औषधांची नावे जो वाचू शकेल अशा व्यक्तीला औषध दुकान उघडण्याची परवानगी देण्यात येईल. बेरोजगारांना यामुळे संधी मिळेल आणि ग्रामीण आदिवासी भागातील लोकांना औषधे सहजपणे उपलब्ध होतील” असे फायदे त्यांनी नमूद केले.**

औषध दुकानांत फार्मासिस्ट हवाच असे बंधन घालणारा १९४८ चा फार्मसी ॲक्ट, १९४० चा औषध आणि सौंदर्यप्रसाधन कायदा आणि २०१५ चे फार्मसी प्रॅक्टिस नियमन यापैकी कशाचीही तमा न बाळगता या भूमीतले कायदे सर्रास मोडीत काढून ही घोषणा झाली. ५०० दुकानांसाठी अर्जही मागवण्यात आले. अर्थात सर्वत्र खळबळ माजली, विरोध झाला, तेथील फार्मासिस्ट संघटनेने मुख्यमंत्र्यांच्या प्रतिमेचे दहन केले. प्रचलित कायद्यांना छेद देणारे वक्तव्य मुख्यमंत्र्यांसारखी जबाबदार व्यक्ती करते, तेव्हा त्यामागे नक्कीच कायद्याच्या चौकटीतच बसणारी चतुर तरतूद असणार हे ओघानेच आले.

ऑक्टोबर २०२१ मध्येच झारखंड शासनाच्या आरोग्य विभागातर्फे फतवा निघाला होता की प्रत्येक ग्रामपंचायत विभागात एक औषध दुकान काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.

किमान बारावी असणाऱ्या व्यक्तीदेखील यासाठी अर्ज करू शकतील. मात्र ही औषध दुकाने-‘निम्न-औषध दुकाने’’ असतील. यात ज्यासाठी डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनची जरुरी नसते अशी, केवळ किरकोळ आजारांवरील ओटीसी (OTC) औषधेच, ठेवता येतील. नेहमीच्या औषध दुकानांमध्ये प्रिस्क्रिप्शनने मिळणारी औषधे (शेड्युल जी, एच, एक्स.)असतात, ती ठेवता येणार नाहीत. फतव्यासोबत मंजूर औषधांची सूची जोडण्यात आली, यात ओटीसी म्हणजे उदा. पॅरासिटामोल, ॲस्पिरिन, ॲण्टासीड्स, बाम, क्रीम्स वगैरे आहेत. सूचीखेरीजची औषधे ठेवली तर दुकानदारास शिक्षेची तरतूदही आहे. हा फतवा बेकायदेशीर नाही. औषध कायद्यांतर्गत ‘मर्यादित परवाना’(फॉर्म २०अ, २१अ) देण्याची सोय आहे. त्या अंतर्गत अशा औषध दुकानांना (ड्रगस्टोर) परवानगी देता येते. नेहमीच्या औषध दुकानांना आवश्यक तेवढीच म्हणजे १० स्क्वेअर मीटर जागा या मर्यादित दुकानास आवश्यक. मात्र तिथे नोंदणीकृत फार्मासिस्टची सक्ती नाही. रुग्णास प्रिस्क्रिप्शन औषधांची गरज असेल तर दुकानदाराने जिल्ह्याच्या ठिकाणी पूर्ण परवानाधारी औषध दुकान असेल (त्यात फार्मासिस्ट सक्तीचा) तेथून आवश्यक औषधे मागवून द्यावी अशी ही व्यवस्था.

वरकरणी पाहता ही व्यवस्था ठीक वाटते ना? समाजहिताची वगैरे? हो, फार पूर्वी तत्कालीन परिस्थितीनुसार ते योग्यही असेल. १९४० साठी केलेल्या औषध कायद्यातील मर्यादित परवाना हा प्रकार त्या काळास अनुसरून असणार. पूर्वी फार्मसी कॉलेजेस देशात नगण्य होती, फार्मासिस्टची मोठी कमतरता होती अशा परिस्थितीसाठी ही तरतूद योग्यच. पण आज आपण स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांत, २०२३ मध्ये आहोत. देशात एकूण चार हजारच्या वर फार्मसी कॉलेजेस आहेत. दरवर्षी तीन लाखांहून अधिक फार्मासिस्ट डिप्लोमा, किंवा डिग्री घेऊन बाहेर पडतात.

झारखंडमध्येही १०० एक फार्मसी कॉलेजेस आहेत. त्यामुळे ‘मर्यादित परवाना’ ही कालबाह्य झालेली तरतूद का आणि कुणाच्या भल्यासाठी? खरे तर औषध कायद्यातील शेड्युल “क” मध्ये वरील उल्लेखलेली ओटीसी औषधे ठेवण्यासाठी परवाना सूट दिलेली आहे. म्हणजे मर्यादित परवाना. अर्धेमुर्धे औषध दुकान काढण्याचीही गरज नाही.या अर्ध-परवानाधारी ड्रगस्टोरमध्ये महत्त्वाची प्रिस्क्रिप्शन औषधे मिळणारच नसतील तर ती कितपत उपयुक्त होतील? ओटीसी औषधे पुरवण्यासाठी आशा सेविका (सहिया म्हणतात तिथे )असतीलच ना? शिवाय प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत.

## संपादकीय »

# नियोजनाची लक्तरे

***उत्तर भारताला महापुराचा तडाखा बसला. हवामानबदल आणि त्याला तोंड देण्यास अपुरी सज्जता आणि दूरदर्शी नियोजनाचा अभाव हीच त्याची ठळक कारणे आहेत.***

आधी ये रे ये रे पावसा... अशी आळवणी करणाऱ्या उत्तर भारतवासीयांना काही काळातच नको नको रे पावसा, असा अतिधिंगाणा... असे आर्जव करायची वेळ आली आहे. हिमाचल प्रदेश, पंजाब, हरयाणा, उत्तराखंड, जम्मू-काश्मीरमध्ये आठवडाभर धडकी भरवणाऱ्या पावसाने आणि राजधानी दिल्लीत यमुना नदीच्या महापुराने हाहाकार माजवला आहे. एकुणात उत्तर भारतात महापूर आणि अतिवृष्टीने हजारो लोक विस्थापित झाले. अनेक यात्रेकरू, पर्यटकांना सुरक्षितस्थळी हलवावे लागले. विनाशकारी आपत्तीमुळे हजारो कोटींच्या संपत्तीचा विनाश पाहावा लागला. हरयाणातील हाथीकुंडमधून सोडलेले अतिरिक्त पाणी असो, व्यवस्थापन आणि धोरणात्मक बाबींच्या अंमलबजावणातील दिरंगाई या सगळ्यांमुळे दिल्लीला अनेक वर्षांनंतर पहिल्यांदा महापुराने हवालदिल व्हावे लागले. गेल्या ४५ वर्षांत पहिल्यांदा यमुना नदीने महापूर पातळीचा नवा उच्चांक प्रस्थापित केला.

**घर सगळ्यांचे असते. मात्र, आजही सगळी जबाबदारी घरातील गृहिणीची असे म्हणून अनेक कुटुंबातील सदस्य स्वतःची जबाबदारी झटकून टाकताना दिसतात. काळ बदलत आहे, आत्मनिर्भतेचा मंत्र जपणाऱ्या आजच्या पिढीने या बाबतीतही अधिक सर्तक राहिल्यास त्यांचे कौटुंबिक जीवन अधिक समृद्ध व आनंदी होईल. त्यासाठी घरात एकत्र राहण्याचे ‘मॅनर्स’ सगळ्यांनीच शिकले पाहिजेत.**

# 'मॅनर्स' नावाचा कानमंत्र

प्रत्येक मुलाची पहिली शाळा हे त्याचे कुटुंब असते. भाषा, नाती, धर्म, संस्कार, संस्कृती, भाव-भावनांचे व्यवस्थापन व अगदी दैनंदिन जीवनातील एकमेकांशी वागण्याचे नियम, शिस्त किंवा मॅनर्स; मुले याच ‘कुटुंब’ नावाच्या शाळेतून शिकत असतात. आज मात्र स्पर्धेच्या युगात मुलांना अगदी साधे सोपे जगण्याचे नियम शिकविणे फारसे महत्त्वाचे मानले जात नाही, असे दिसते. याचा दुरोगामी परिणाम म्हणून अनेक मुले स्वकेंद्रीत होताना दिसतात. सर्वांनीच कुटुंबातील नियम, शिस्त व एकमेकांप्रती स्नेहभाव वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने काही संकेत पाळणे आवश्यक असते. सकारात्मक जीवनशैलीचा विचार करता, या बाबी प्रत्येकाच्या आयुष्यात खूप महत्त्वाच्या ठरतात. आपल्यामुळे दुसऱ्याची अडचण होणार नाही ना? आपल्या बेपर्वा वागण्याने कुटुंब म्हणून सर्वांचेच नुकसान होणार नाही ना? किंवा कुटुंब म्हणून सुव्यवस्था



राखण्यासाठी माझा सहभाग आहे का, हे कुटुंबातील प्रत्येकाला वाटले पाहिजे व ते समजून घेवून तसे वागणे याला आपण कुटुंबातील ‘मॅनर्स’ असे म्हणूयात. सुई-दोरा वापरण्याचा एक नियम पूर्वी पाळला जायचा, एखाद्याने दोऱ्याने काही शिवले आणि ओवलेला दोरा संपला, तर त्याने परत सुईत दोरा ओवून गाठ मारून तो नीट रिळाला गुंडाळून ठेवायचा. सुई हरवत नाही व दुसऱ्याला सुईला दोरा लावलेला मिळतो. त्याचे काम झाले, की त्याने परत तेच करायचे. याला आपण कुटुंबातील ‘मॅनर्स’ म्हणूया. हल्ली मात्र कुटुंबात अनेक वस्तू प्रत्येकाच्या म्हणून स्वतंत्र असतात. उदा. छत्री, पाण्याची बाटली इ. मात्र, कुटुंब म्हणून छत्री वापरण्याचे काही नियम असतात. प्रत्येकाने ओली छत्री गॅलरीत, अंगणात ठेवून; कोरडी करून घरात आणणे व ठरावीक ठिकाणी ठेवणे. या नियमाचे उल्लंघन झाल्यास सगळ्यांचाच छत्र्या ओल्या होतात व अडचणही. मी माझ्या पुरता विचार न करता कुटुंबातील सर्वांचा विचार करणे म्हणजे देखील ‘मॅनर्स’चा एक भाग असतो. त्यातून आपल्या माणसाची काळजी आहे, असा किती तरी मोठा भाव अशा कृतीमधून उमटत असतो. अनेकदा तो सगळ्यांनाच सुखावून जातो नाही का? अगदी भर उन्हाळ्यात, माठातून अथवा फ्रिजमधून प्रत्येकाने स्वतः पाणी पिल्यानंतर दोन तांबे पाणी पुढच्या साठी भरून ठेवणे ही कृतीही कौटुंबिक नात्यांची वीण घट्ट व उबदार करण्यास पूरक ठरत असते. नाती ही एकमेकांचे करण्याने फुलत जातात; त्यामुळे एकमेकांचे करताना या छोट्या; परंतु मोठे व सकारात्मक परिणाम गाठणाऱ्या गोष्टी नात्याला अर्थ देणाऱ्या ठरत असतात.

## ।। अभंगवाणी ।।



सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥

गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विठ्ठला सांभाळून घे..!

## भुजबळांनी धरले शरद पवारांचे पाय; पवारांचे मात्र मौन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित मंत्र्यांसह शरद पवार यांची आज वाय.बी. चव्हाण सेंटरमध्ये जाऊन अचानक भेट घेतली. जवळपास पाऊन तास चर्चा झाल्यानंतर हे सर्व नेते बाहेर पडले. पण यात शरद पवारांनी मौन बाळगल्याचे समोर आले आहे. दरम्यान, बंडानंतर प्रथमच शरद पवारांच्या भेटीला गेल्यानंतर काही राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी थेट पवारांचे पाय धरत विठ्ठला सांभाळून घे रे आम्हाला, अशी विनवणी केली. त्यानंतर सर्वच नेते पवारांच्या पाया पडले. या सर्व घटनेची इनसाइट स्टोरी आता माध्यमांसमोर आली आहे.**



अजित पवारांसह नवनिर्वाचित मंत्र्यांनी शरद पवारांची भेट घेतली. यावेळी सर्वच नऊ मंत्र्यांनी शरद पवार यांचे आशिर्वाद घेतले. शरद पवारांना वाय.बी. चव्हाण सेंटरवर अजित पवारांचा गट भेटला. यावेळी छगन भुजबळ पवारांच्या समोर आले आणि विठ्ठला सांभाळून घे रे आम्हाला, असं म्हणत थेट पवारांच्या पाया पडले. त्यानंतर जवळपास सर्वच नेत्यांनी पवारांच्या पाया पडत हात जोडत आम्हाला माफ करा आणि आम्हाला आशीर्वाद द्या, अशी भूमिका मांडत विनंती केली.

विठ्ठला सांभाळून घे रे असे उद्गार काढत छगन भुजबळ शरद पवारांच्या पाया पडले. याभेटी दरम्यान जवळपास सर्वच मंत्र्यांनी शरद पवारांच्या पाया पडत हात जोडले.

मंत्री आणि शरद पवार यांच्यामध्ये जवळपास तासभर चर्चा झाल्याचे समजतेय. यात सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, आदिती तटकरे, धनंजय मुंडे, संजय बनसोडे आदींचा सहभाग होता. ही माहिती मिळताच जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड देखीलही तातडीने वाय. बी. चव्हाण सेंटरवर दाखल झाले. मला सुप्रिया सुळेंचा फोन आला म्हणून मी लवकर निघालोय. शरद पवारांनी बोलवलंय, लवकर या असं मला सांगितलं, अशी प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी माध्यमांशी दिली. शरद पवार यांच्यासोबतच्या भेटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी माध्यमांशी संवाद साधला आणि भेटीविषयी माहिती दिली. प्रफुल्ल पटेल म्हणाले की, आम्हा सर्वांचे दैवत आदरणीय शरद पवार यांची आज भेट घेतली. त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी भेट घेतली. शरद पवार हे बैठकीच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये असल्याचं समजलं. त्यामुळे वेळ न मागता आम्ही इथे आलो आणि त्यांच्या पाया पडून आशीर्वाद घेतला. राष्ट्रवादी काँग्रेस एकसंध कसा राहिल याचाही विचार करुन त्यांनी येत्या काही दिवसात मार्गदर्शन करावा अशी विनंती केली.

### शरद पवार काय निर्णय घेणार?

अजित पवार गटातल्या मंत्र्यांनी आज अचानक शरद पवार यांची भेट घेतली. या नेत्यांनी एक तास शरद पवार यांच्याशी चर्चा केली. मात्र, या भेटीत शरद पवार यांनी आमच्याशी काहीच भाष्य केलं नसल्याचं प्रफुल्ल पटेल यांनीच सांगितले आहे. त्यामुळे शरद पवार यावर काय निर्णय घेणार हे येत्या काळातच समजणार आहे.

# विरोधकांनी आत्मविश्वास गमावला

## त्यांना कामातून उत्तर देऊ : मुख्यमंत्री शिंदे

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नेहमीप्रमाणे विरोधी पक्षाने चहापानावर बहिष्कार घातला. पण विरोधी पक्षाचा विचार असतो की, राज्याला न्याय कसे मिळेल? पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे. कारण विरोधीपक्षाने आत्मविश्वास गमावला आहे. असा घणाघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. पावसाळी अधिवेशनापूर्वी रविवारी सायंकाळी सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांशी साधला.**



### वर्षभरात सरकार अधिक मजबूत झाले

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सरकार पडेल पडेल असे म्हटले तरी सरकार अधिक मजबूत झाले. त्यामुळे आता विरोध करू नका, नाहीतर आणखी काय होईल हे सांगता येणार नाही. लोकशाहीमध्ये ज्या पद्धतीने वागले पाहिजे, तशीच कामगिरी या काळात होणार आहे. त्यानुसार विरोधकांच्या प्रश्नांना दुय्यम स्थान दिले जाणार नाही. शिंदे म्हणाले की, 210 पेक्षा जास्त आमदार सरकारच्या पाठीशी आहे. त्यामुळे आत्मविश्वास गमावलेला विरोधीपक्षाची भूमिका आजची दुर्दैवी आहे.

या पत्रकारपरिषदेला मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांची उपस्थिती होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, विरोधीपक्षाचा अधिकार आहे की, त्यांनी सर्वसामान्यांचे प्रश्न मांडले पाहिजे, त्याची उत्तरे ही सत्ताधाऱ्यांनी दिली पाहिजे. आम्ही कोणालाही विरोध करणार नाही. आलेल्या प्रत्येक लक्षवेधीला आमचे मंत्री उत्तरे देतील, असा विश्वास त्यांनी दिला. विरोधीपक्षनेता म्हणून आम्ही तिघेही होतो. आम्हाला त्याचा अनुभव आहे.

सरकार चुकतेय तिथे नक्की जाब विचारण्याचा अधिकार आहे. जे-जे प्रश्न येतील, त्याला प्रत्येक मंत्री उत्तर देऊ. कोणालाही तक्रार करण्याची संधी देणार नाही. आम्ही या अधिवेशनातून नक्की काम होईल. हे सरकार शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही, विरोधकांचा सन्मान केला जाईल, असे विधान एकनाथ शिंदे यांनी केले.

# आजपासून पावसाळी अधिवेशन

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशन आजपासून सुरू होणार आहे. 17 जुलै ते 14 ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहे. हे अधिवेशन मुंबईत पार पडणार असून 15 दिवस सुरू राहणार आहे. दरम्यान, 17 जुलै पासून सुरु होणारे पावसाळी अधिवेशन वादळी होण्याची शक्यता आहे. अधिवेशन सुरु होण्यापूर्वीच विरोधक एकवटले असून राज्य सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकला आहे. प्रथेप्रमाणे पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला, सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित चहापान कार्यक्रम होणार होता. लोकशाहीच्या प्रथा, परंपरेप्रमाणे विधीमंडळाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापान कार्यक्रमास उपस्थित राहून राज्यासमोरील प्रश्नांबाबत विचारविमर्श करण्यास आम्हाला निश्चितंच आवडले असते. राज्यात आणि देशात लोकशाही शिल्लक उरली नसल्याचे भेसूर चित्र समोर येत आहे. विरोधी गटातील राजकीय पक्ष फोडून पक्षच पळवून नेण्याचे सुरु असलेले राजकारण पहाता राज्यात लोकशाहीचा दर्जाच घसरलेला आहे. तसेच लोकशाही टिकविण्याची जबाबदारी असलेल्या स्वायत्त संस्थाचा वापर विरोधी पक्षाच्या सदस्य व कार्यकर्ते यांच्यावर दबाव तंत्र निर्माण करण्यासाठी करण्यात येत आहे.

# काँग्रेसचा 'आप'ला पाठिंबा

## मोदी आडनाव प्रकरण गुजरात हायकोर्टाने ठोठावली होती शिक्षा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विरोधी पक्षांची दुसरी बैठक 17 आणि 18 जुलै रोजी बंगळुरूमध्ये होणार आहे. बैठकीच्या एक दिवस आधी काँग्रेसने दिल्लीच्या अध्यादेशावर आपली भूमिका स्पष्ट केली. काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल म्हणाले - आम्ही केंद्राच्या अध्यादेशाला पाठिंबा देणार नाही.**

यासोबतच वेणुगोपाल यांनी विरोधकांच्या बैठकीत आम आदमी पक्षाच्या सहभागाला दुजोरा दिला. वेणुगोपाल म्हणाले- ते (आप) उद्याच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. विरोधकांच्या या बैठकीत 25 पक्ष सहभागी होणार आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अध्यादेशावर विरोधकांचा पाठिंबा मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. 20 जुलैपासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार सादर करणार असलेल्या 21 विधेयकांमध्ये दिल्ली अध्यादेशाचाही समावेश आहे. 20 मे रोजी केंद्र सरकारने दिल्लीतील अधिकाऱ्यांच्या बदल्या-पोस्टिंगबाबत अध्यादेश जारी केला. या अंतर्गत निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार दिल्लीच्या एलजींकडे असतील. केजरीवाल यांचा याला विरोध आहे. यावर त्यांनी काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांचा पाठिंबा मागितला आहे. केंद्र सरकारने या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी राज्यसभेत विधेयक आणले तर विरोधकांनी आम्हाला पाठिंबा द्यावा, असे केजरीवाल यांनी 21 मे रोजी म्हटले होते. विरोधक एकत्र राहिल्यास 2024 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचा अंत होईल. या अध्यादेशाला विरोध करण्यासाठी केजरीवाल यांनी आतापर्यंत 3 मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आहे. 21 मे रोजी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी स्वतः त्यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला होता. 23 मे रोजी केजरीवाल यांनी कोलकाता येथे जाऊन ममता बॅनर्जींकडे पाठिंबा मागितला. त्यांनी 24 मे रोजी मुंबईत उद्धव ठाकरे आणि 25 मे रोजी शरद पवार यांची मुंबईतच भेट घेतली. यानंतर, 28 मे रोजी त्यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांची भेट घेतली आणि त्यांचा पाठिंबा मागितला. 17 जुलै, 18 जुलैला विरोधकांच्या दुसऱ्या बैठकीपूर्वी सोनिया गांधींनी सर्व पक्षांच्या नेत्यांना डिनरसाठी बोलावले आहे. त्याआधी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी विरोधी पक्षाच्या प्रमुख नेत्यांना पुढील बैठकीला उपस्थित राहण्याचे निमंत्रण पाठवले होते.

बंगळुरूच्या बैठकीत आणखी आठ नवीन पक्ष सामील होत आहेत. यामध्ये मारुमलार्ची द्रविड मुन्नेत्र कळघम (MDMK), कोंगू देसा मक्कल काची (KDMK), विदुथलाई चिरुथाईगल काची (VCK), रिव्हेल्युशनरी सोशालिस्ट पार्टी (RSP), ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक, इंडियन युनियन मुस्लिम लीग (IUML), केरळ काँग्रेस (जोसेफ) यांचा समावेश आहे. आणि केरळ काँग्रेस (मणी) यांनी सहमती दर्शवली आहे. या नवीन पक्षांपैकी KDMK आणि MDMK हे 2014 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे मित्र होते. 23 जून रोजी पाटणा येथे विरोधी ऐक्याची पहिली बैठक झाली, ज्यामध्ये 17 हून अधिक राजकीय पक्ष सहभागी झाले होते. ही बैठक बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी बोलावली होती. ज्यामध्ये राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.



### काँग्रेस भूमिका ठरवू शकलेली नाही

18 जुलै रोजी भाजपने एनडीएच्या मित्रपक्षांची बैठक बोलावली आहे. पक्षाध्यक्ष जेपी नड्डा यांनी एनडीएमध्ये सहभागी असलेल्या सर्व पक्षांना निमंत्रण पाठवण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही वर्षांत विविध मुद्द्यांवर एनडीएशी फारकत घेतलेल्या पक्षांनाही नड्डा यांनी पत्रे लिहिली आहेत. देशात समान नागरी संहिता (यूसीसी) संदर्भात शनिवारी काँग्रेसची बैठक झाली. मात्र, या बैठकीतही काँग्रेस आपली भूमिका ठरवू शकलेली नाही. काँग्रेस नेते केटीएस तुलसी यांनी सांगितले की, यूसीसीबाबत अद्याप काहीही निर्णय झालेला नाही. केंद्र सरकार UCC मसुदा देईल तेव्हा पक्ष त्यावर निर्णय घेईल.

---

# आर माधवनच्या सेल्फीची चर्चा

## मोदी आणि फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांसह फोटो व्हायरल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बॉलीवूड अभिनेता आर माधवनने '३ इडियट्स', 'रहेना है तेरे दिल में' अशा अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. अभिनेता त्याच्या चित्रपटांबरोबर वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असतो. आर माधवन अलीकडेच पॅरिसमधील 'बॅस्टिल डे' कार्यक्रमात सहभागी झाला होता. या कार्यक्रमाला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन उपस्थित होते. माधवनने या दोन्ही दिग्गजांबरोबर सोशल मीडियावर खास फोटो शेअर केले आहेत.**



### "जय हो, जय हिंद" : अनुपम खेर

आर माधवनने या पोस्टमध्ये पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती इमॅन्युएल मॅक्रॉन या दोघांचेही आभार मानले आहे. अभिनेत्याने शेअर केलेल्या फोटोवर सध्या नेटकरी लाइक्स आणि कौतुकाचा वर्षाव करत आहेत. या फोटोवर अभिनेत्री शिल्पा शेट्टीने "मला तुझा खूप अभिनेता वाटतोय" अशी कमेंट केली आहे. तसेच फोटोंवर प्रतिक्रिया देत ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांनी "जय हो, जय हिंद" असे म्हटले आहे.

आर माधवनने शेअर केलेले फोटो सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहेत. तर काही जणांना हा कार्यक्रम नेमका काय होता? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स दौऱ्यावर असताना त्यांच्या सन्मानासाठी लूव्रे म्युझियम येथे खास जेवणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अभिनेता आर माधवन सहभागी झाला होता. आर माधवनला या कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यात आले होते. त्याने या संपूर्ण कार्यक्रमातील अनेक फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. फोटो शेअर करत अभिनेता लिहितो, "१४ जुलै २०२३ रोजी मी पॅरिसमध्ये संपन्न झालेल्या 'बॅस्टिल डे' सेलिब्रेशनमध्ये सहभागी झालो होता. यामुळे भारत आणि फ्रान्स या देशातील संबंध अधिक घट्ट झाले. उपस्थित प्रत्येकाला एकमेकांप्रती प्रचंड आदर होता.

---

# दिल्लीला दिलासा; पुराच्या पातळीत घट

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**यमुना नदीला आलेला पूर हळूहळू ओसरू लागला आहे. दिल्लीसह दिल्लीवरील भागातील पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसाचा अंदाज नसल्याची दिलासादायक बातमी आहे.येथे एका पत्रकार परिषदेत विभागीय आयुक्त अश्वनीकुमार यांनी सांगितले, की राष्ट्रीय राजधानीतील पूरग्रस्त भागातील स्थिती सुधारत आहे.**

दिल्लीच्या वरच्या भागातील पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसामुळे, यमुनेने धोक्याची पातळी ओलांडली आहे. अनेक भाग अद्याप पाण्याखालीच आहेत आणि सखल भागात राहणाऱ्या हजारो लोकांना सुरक्षित ठिकाणी जाण्यास भाग पाडले आहे. अश्वनीकुमार यांनी सांगितले, की यमुनेचा जलस्तर ओसरू लागला आहे. सध्या दिल्ली आणि वरच्या भागातील पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसाची शक्यता नाही. पूरग्रस्त भागातही परिस्थिती सुधारत आहे. शहरातील पूर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या अधिकाऱ्यांना लक्ष्य करणाऱ्या लोकप्रतिनिधींबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, अधिकाऱ्यांवर बिनबुडाचे आरोप करू नयेत. त्यामुळे अधिकाऱ्यांचे लक्ष विचलित होते. नीतिधैर्य ढासळते. यमुनेची पातळी तीन दिवस सातत्याने वाढल्यानंतर शुक्रवारपासून त्यात घट होऊ लागली. शनिवारी सकाळी १० पर्यंत ही पातळी २०७.४३ मीटरपर्यंत घटला होता. तर गुरुवारी रात्री आठला ही पातळी २०८.६६ मीटर होती.

# काजोलची छोट्या पडद्यावर एंट्री !



९०च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्री काजोलनं आपल्या जबरदस्त अभिनयातून ओटीटीवर एक वेगळीच छाप पाडली आहे. 'लस्ट स्टोरीज २' या चित्रपटानंतर काजोलची नुकतीच 'द ट्रायल' वेब सीरिज प्रदर्शित झाली आहे. या वेब सीरिजमध्ये अभिनेत्रीनं पहिल्यांदाच वकिलाची भूमिका साकारली आहे. ओटीटीनंतर आता काजोलची छोट्या पडद्यावर एंट्री होणार आहे. लोकप्रिय हिंदी मालिका 'ये रिश्ता क्या कहलाता है'मधून काजोल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून राजन शाही यांची 'ये रिश्ता क्या कहलाता है' ही मालिका प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. या मालिकेची लोकप्रियता पाहून काजोलनं हा मोठा निर्णय घेतला आहे. 'ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकेमध्ये 'द ट्रायल' वेब सीरिजचे प्रमोशन करण्यासाठी काजोल एंट्री करणार आहे. याचा व्हिडीओ स्टार प्लसच्या इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. त्यामुळे आता काजोलला मालिकेत पाहण्यासाठी प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. 'ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकेत अभिनेता हर्षद चोप्रानं अभिमन्यू, तर अभिनेत्री प्रणाली राठोडनं अक्षरा ही प्रमुख भूमिका साकारली आहे. 'अभिरा' असं या जोडीचं नाव आहे. तर काजोलची 'द ट्रायल' ही वेब सीरिज 'द गुड वाइफ' या अमेरिकन सीरिजचं हिंदी रूपांतर आहे. अजय देवगण, दीपक धर, मृणालिनी जैन व राजेश चड्ढा यांनी या सीरिजची निर्मिती केली आहे. १४ जुलैला 'डिस्नी प्लस हॉटस्टार'वर ही सीरिज प्रदर्शित झाली आहे.

# जीवनात तडजोडही गरजेची



आलिया भट्टने नुकतेच तिच्या करिअर आणि वर्क लाईफ बॅलेन्सबद्दल सांगितले. यादरम्यान अभिनेत्रीने सांगितले की, एक काळ असा होता की ती कामासाठी तिच्या कुटुंबाचा वेळ आणि झोपेसोबतही तडजोड करण्यास तयार होती. पण, आता तिला तसं वाटत नाही. दरम्यान, अभिनेत्रीने गेल्या दशकात तिच्या आयुष्यात झालेल्या बदलांबद्दल सांगितले. ती म्हणाली की तिला कोणीतरी सांगितले होते की ती चांगली आई, चांगली मुलगी किंवा चांगली अभिनेत्री होऊ शकत नाही. तिने सांगितले की सर्वोत्कृष्ट असणे खरोखर कठीण आहे... आलिया असेही म्हणाली की ती कुटुंबासाठी काम करणे कधीही थांबवणार नाही. फेमिनाशी बोलताना आलियाने इंडस्ट्रीतील तिचे सुरुवातीचे दिवस आठवले आणि कालांतराने तिचे काम कसे तिचे प्राधान्य बनले. ती म्हणाली- 'जसे मी सिनेमात एक दशक ओलांडले, गोष्टी विकसित होत गेल्या. मात्र, या दशकात माझे आयुष्य खूप बदलले आहे. मला वाटते की एक काळ असा होता जेव्हा मी सर्व प्रकारचे त्याग करण्यास तयार होते. झोप, माझ्या कुटुंबासह वेळ. त्यावेळी माझ्या आयुष्यात काम आणि शूटिंग या दोनच गोष्टी होत्या. आलिया पुढे म्हणाली, 'पण आता माझे कुटुंब आहे... मला एक मुलगी आहे. माझा नवरा आहे. कधीकधी मला असे वाटते की मी माझ्या आई-वडिलांसोबत, माझ्या बहिणीसोबत आणि माझ्या मित्रांसोबत ही 10 वर्षे घालवली नाहीत. पण आता मला ते शक्य करायचं आहे. वर्क लाईफ बॅलन्सबद्दल बोलताना आलिया पुढे म्हणाली – अर्थात काम करणे कधीही थांबवू नये, पण आयुष्यात संतुलन आणण्याचा प्रयत्न करावा. आलियाने पुढे काम आणि वैयक्तिक आयुष्यामध्ये समतोल साधण्याचे तिचे विचार शेअर केले. ती म्हणाली- 'समतोल नेहमी सारखा असू शकत नाही. तुम्हाला नेहमी कोणत्या ना कोणत्या बाबतीत तडजोड करावी लागते. आपण एकाच वेळी सर्वकाही करू शकतो असे आपल्याला वाटत असल्यास, कदाचित करूही शकाल. पण तुमच्या मानसिक शांततेला मात्र नक्कीच धक्का पोहोचेल. 'माझ्यासोबत असे अनेकदा घडते, कारण मला सर्वत्र हजर राहायचे आहे...आणि मला व्यावसायिकरित्याही सक्रिय व्हायचे आहे. पण या सगळ्या गोष्टींमध्ये मला स्वतःसाठी वेळ मिळत नाही. म्हणूनच मला वाटते की आपण प्रथम आपल्या प्राधान्यक्रमांचा विचार केला पाहिजे. अभिनेत्री शेवटी म्हणाली- 'मला कोणीतरी सांगितले की तू कधीच ग्रेट आई, ग्रेट मुलगी किंवा ग्रेट अभिनेत्री होणार नाहीस. मला असे वाटते की सर्वोत्तम असणे हा एक ओव्हररेट केलेला शब्द आहे. आपल्या आजूबाजूला ग्रेट नेसला अधिक महत्त्व दिले जाते. आपण फक्त छान आणि प्रामाणिक असणे आवश्यक आहे ... खुले रहा. म्हणून मी तेच करण्याचा प्रयत्न करतो. मी माझ्या कुटुंबीयांशी आणि मित्रमैत्रिणींशी मोकळेपणाने बोलते. तरीही कधी-कधी मला असं वाटतं की मी खूप जबाबदारी घेत आहे, पण ही जबाबदारी घेऊन पुढे जात आहे असंही मला वाटतं.

# सलमान-करिनाचा वर्कफ्रंट



सलमान खानचा एक जुना व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो शाहरुख खानच्या चित्रपटातील 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या गाण्यावर करिनासोबत रोमान्स करताना दिसत होता. व्हिडिओमध्ये, सलमान एका स्टेज शोमध्ये परफॉर्म करत आहे, जिथे तो राज (शाहरुख) ची भूमिका करत आहे आणि करीना सिमरन (काजोल) च्या रूपात स्टेजवर प्रवेश करते.

यादरम्यान तो किंग खानच्या 'तुझे देखा तो ये जाना सनम' या आयकॉनिक गाण्यावर लिप सिंक करताना दिसला. त्याच्या हातात गिटार आहे. यानंतर करीना स्टेजवर येते आणि सलमान गुडघ्यावर बसतो आणि करीनाच्या हाताचे चुंबन घेतो. व्हिडिओमध्ये करीना पांढऱ्या रंगाच्या लेहेंग्यात दिसली. तिने या लुकसोबत मॅचिंग ज्वेलरी घातली होती, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत आहे. तर सलमान ग्रे टी-शर्ट आणि डेनिम जीन्समध्ये दिसला. सलमान खान लवकरच टायगर 3 मध्ये दिसणार आहे. हा YRF स्पाय युनिव्हर्सचा भाग आहे आणि एक था टायगर आणि टायगर जिंदा है नंतर टायगर फ्रँचायझीमधील तिसरा चित्रपट आहे. टायगर 3 मध्ये कतरिना कैफ आणि इमरान हाश्मी यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.

# जस्सी जैसी कोई नहीं

ओटीटी प्लॅटफॉर्मवर आपल्या दमदार अभिनयानं अभिनेत्री मोना सिंह हिनं प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. 'जस्सी जैसी कोई नहीं' या मालिकेतून घराघरात पोहोचलेली मोना सिंह शेवटची 'लाल सिंह चड्डा' चित्रपटात दिसली होती. त्यानंतर ती 'कफस' या वेब सीरिजमधून प्रेक्षकांच्या भेटीस आली. नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत अभिनेत्रीनं एक मोठा खुलासा केला आहे. इंडस्ट्रीत येण्यापूर्वी मोना सिंहलादेखील कास्टिंग काऊचला सामोरं जावं लागलं होतं. 'इंडिया टुडे' या वृत्तसंस्थेच्या मुलाखतीत मोना सिंहला विचारलं गेलं की, "तुलाही इंडस्ट्रीमध्ये कास्टिंग काऊचचा सामना करावा लागला होता का?" तेव्हा अभिनेत्री म्हणाली की, "होय. मी याचा सामना केला होता. 'जस्सी जैसी कोई नहीं' या मालिकेच्या आधीचा हा अनुभव होता. त्यावेळेस मी ऑडिशनसाठी पुण्याहून मुंबईला येत असे. या काळात मी अशा लोकांना भेटले, ज्यांच्यामुळे मला अवघडल्यासारखं, विचित्र आणि भयानक वाटलं. पुढे मोना म्हणाली की, "स्त्रीकडे एक असं वरदान आहे, ज्याच्यामुळे तिला कळतं की, कोण आपल्याबरोबर चांगलं आणि वाईट वागतंय. मग ती स्त्री कितीही निष्पाप, कमकुवत असो किंवा लहान असो; तिच्या भावना कधीच चुकीच्या नसतात. त्यामुळे त्यावेळेस मी फक्त अवघड स्थितीत आहे, आता काय करू? यातून कशी बाहेर पडू? याचाच विचार करत होते.

# राखी सावंतची मोठी फसवणूक

अभिनेत्री राखी सावंत नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. तुझ्या आयुष्यात सतत काही ना काही ड्रामा घडत असतो. तर आता तिच्या ड्रायव्हरने तिची मोठी फसवणूक केली असं तिने सांगितलं आहे. राखी सावंत नेहमीच तिच्या आयुष्यात घडणाऱ्या सर्व घडामोडी तिच्या चाहत्यांशी शेअर करत असते.



नुकतीच ती तिच्या आलिशान गाडीच्या ऐवजी रिक्षातून फिरताना दिसली. राखी सावंतचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये ती रिक्षात बसून मीडिया फोटोग्राफरशी संवाद साधताना दिसत आहे. ती म्हणते, "आयुष्यात सुख नावाची गोष्ट आहे ती मला कधी मिळणार आहे का? काल माझा ड्रायव्हर पप्पू यादव माझ्या बीएमडब्ल्यू गाडीची चावी, पैसे, सोन्याचा फोन, मर्सिडीज गाडी घेऊन फरार झाला.

# दुलीप ट्रॉफी दक्षिण विभागाच्या नावे

## सूर्या-पुजारा-पृथ्वी असूनही पश्चिम विभागाचा पराभव

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**दुलीप ट्रॉफीच्या अंतिम फेरीच्या सामन्यात पश्चिम विभागाचा पराभव करून दक्षिण विभागाने दुलीप करंडक २०२३ ची चॅम्पियन ठरली आहे. स्पर्धेच्या ६१ वर्षांच्या इतिहासात दक्षिण विभागाने १२व्यांदा ट्रॉफी जिंकली. मजबूत असलेल्या गतविजेत्या पश्चिम विभागासमोर अंतिम फेरीत २९८ धावांचे लक्ष्य ठेवले होते.**



पृथ्वी शॉ, सूर्यकुमार यादव, चेतेश्वर पुजारा, सरफराज खान अशी मोठी नावे सपशेल अपयशी ठरली. कर्णधार प्रियांक पांचलने सर्वाधिक ९५ धावा केल्या, पण तो बाद होताच सर्व आशा धुळीस मिळाल्या. चॅम्पियन दक्षिण विभागाने वासुकी कौशिक आणि साई किशोर (४-४ विकेट्स) यांच्या धारदार गोलंदाजीच्या जोरावर पश्चिम विभागाला २२२ धावांत गारद केले, त्यामुळे विजेतेपदाचा सामना ७५ धावांनी जिंकला.

चेतेश्वर पुजारा भारतीय कसोटी इतिहासातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक. सूर्यकुमार यादव सध्या जगातील नंबर वन टी-२० फलंदाज तर सर्फराज खान कसोटी संघात स्थान मिळवण्याचा सर्वात मोठा दावेदार आहे. मात्र एका गोलंदाजाने या तिन्ही फलंदाजांना एकाच स्पेलमध्ये बाद केले. विद्वथ कवेरप्पा असे या गोलंदाजाचे नाव आहे. त्याचे नाव तुम्ही पहिल्यांदाच ऐकत असाल. मात्र या गोलंदाजाने दुलीप करंडक स्पर्धेत पश्चिम विभागाविरुद्धच्या कामगिरीने खळबळ उडवून दिली आहे. विद्वथ कवेरप्पाकडे उमरान मलिकसारखा वेग नाही पण त्याच्याकडे अचूकता आहे.

### कवेरप्पाच्या ट्रॉफीमध्ये 15 विकेट्स

दुलीप ट्रॉफी फायनलच्या पहिल्या डावात २४ वर्षीय विदवथ कवेरप्पाने ७ फलंदाजांना बाद केले. १९ षटकांच्या स्पेलमध्ये त्याने केवळ ५३ धावा दिल्या. दुसऱ्या डावात कर्णधार प्रियांक पांचालने ९५ धावा करत पश्चिम विभागाला विजयाकडे नेत एक विकेट घेतली. उपांत्य फेरीत उत्तर विभागाविरुद्ध २८ धावांत त्याने ५ विकेट घेतले. त्याने स्पर्धेतील दोन सामन्यांमध्ये १५ विकेट घेत आपल्या संघाला चॅम्पियन बनवले. त्याला अंतिम सामन्यात सामनावीर तसेच टूर्नामेंटचा सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळाला.

२४ वर्षीय कवेरप्पा कर्नाटककडून स्थानिक पातळीवर क्रिकेट खेळतो. दुलीप ट्रॉफीमध्ये दक्षिण विभागाकडून तो सध्या खेळत होता.

उजव्या हाताच्या वेगवान गोलंदाजाने २०२१-२२ च्या हंगामात कर्नाटकसाठी रणजी ट्रॉफीमध्ये पदार्पण केले. कमी वेगामुळे त्याला पदार्पणातही विरोध होत होता. मात्र अवघ्या १२ सामन्यांत त्याने ४९ विकेट्स घेतल्या आहेत.

कर्नाटकातील कोडागु जिल्ह्यातील गोनीकोप्पल येथील असलेल्या कवेरप्पाला आयपीएलमध्ये पंजाब किंग्जने विकत घेतले होते, परंतु २०२३ च्या हंगामात त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही.

# आफ्रिदीचे धक्कादायक विधान

## आमच्यावर भारतात हल्ला झाला

| नवी दिल्ली |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**पाकिस्तान क्रिकेट संघाचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीने भारताबाबत वादग्रस्त विधान केले आहे. पाकिस्तानचा संघ अनेक वर्षांनी भारत दौऱ्यावर येणार आहे. ५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर दरम्यान भारतात एकदिवसीय विश्वचषक २०२३ चे आयोजन करण्यात आले आहे, . दरम्यान, माजी क्रिकेटपटू शाहिद आफ्रिदीने भारताबाबत वादग्रस्त विधान केले आहे.**

गेल्या १० वर्षांपासून भारत आणि पाकिस्तानमध्ये एकही द्विपक्षीय मालिका खेळली गेली नाही. कारण दोन्ही देशांमधील राजकीय संबंध चांगले नाहीत. मात्र भारत आणि पाकिस्तान केवळ आयसीसी स्पर्धांमध्येच आमनेसामने येतात. त्यामुळे अनेक वर्षांनी पाकिस्तानचा संघ एकदिवसीय विश्वचषक खेळण्यासाठी भारतात येत आहे, परंतु त्याआधी भारत आणि पाकिस्तान आशिया कप २०२३ मध्ये देखील



### काय म्हणायचंय आफ्रिदीला?


उल्लेखनीय म्हणजे एकीकडे आफ्रिदी पाकिस्तानला भारतात पाठवण्याबाबत बोलत राहतो तर दुसरीकडे वादग्रस्त विधान करत आहे. यावर आफ्रिदी म्हणाला की, "तुम्ही सगळे म्हणत आहात की, 'पाकिस्तानने भारतात जाऊ नये आणि वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकावा. पण मला असे वाटत नाही. माझा विश्वास आहे की आपण तिथे जावे आणि विश्वचषक जिंकून परत यावे.

आमनेसामने येणार आहेत. दुसरीकडे शाहिद आफ्रिदीच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे आणखी चर्चेला उधाण आले आहे. शाहिद आफ्रिदी म्हणाला की, "आमच्यासाठी भारतात खूप तणावपूर्ण परिस्थिती होती. कारण जेव्हा कधी आम्ही चौकार किंवा षटकार मारायचो तेव्हा टाळ्या वाजायच्या नाहीत. रझाकला आठवत असेल तर, जेव्हा आम्ही बंगळुरू कसोटी जिंकलो तेव्हा आमच्या बसवरही दगडफेक करण्यात आली होती." आफ्रिदीच्या या वादग्रस्त वक्तव्यावेळी त्याचा सहकारी अब्दुल रझाकही उपस्थित होता. पाकिस्तान संघाने २००५ साली भारताचा दौरा केला होता आणि यादरम्यान दोन्ही संघांमध्ये ३ कसोटी आणि ६ एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जात होती. त्याचवेळी पाकिस्तान संघाने कसोटी मालिका १-१ अशी बरोबरीत संपवली. त्याचबरोबर एकदिवसीय मालिका पाकिस्तान संघाने ४-२ ने जिंकली. यादरम्यान आफ्रिदीने एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर कसोटी मालिकेतील शेवटचा सामना खेळला.

# मार्केटा पहिल्यांदाच ग्रँडस्लॅम चॅम्पियन

| नवी दिल्ली |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**चेक गणराजची २४ वर्षीय टेनिसपटू मार्केटा वोंड्रोसोवा शनिवारी यंदाच्या सत्रातील तिसऱ्या ग्रँडस्लॅम विम्बल्डन टेनिस स्पर्धेत चॅम्पियन ठरली. तिने महिला एकेरीचा किताब पटकावला. यासह ही बिगरमानांकित टेनिसपटू करिअरमध्ये पहिल्यांदाच ग्रँडस्लॅम चॅम्पियन ठरली. मार्केटाने एकेरीच्या फायनलमध्ये गत उपविजेत्या ओन्स जेबूरचा पराभव केला.**



तिने ८० मिनिटांमध्ये ६-४, ६-४ अशा फरकाने फायनलमध्ये विजय संपादन केला. यामुळे सहाव्या मानांकित जेबूरला सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तिला गत सत्राच्या फायनलमध्ये एलिनाने पराभूत केले होते. मार्केटा ही चेक गणराज्यची विम्बल्डन किताब जिंकणारी तिसरी महिला टेनिसपटू ठरली आहे. यापूर्वी १९९८ मध्ये जना नोवोत्ना हा किताब जिंकला होता. त्यानंतर पेत्रा क्वितोव्हा २०११ आणि २०१४ मध्ये किताबाची मानकरी ठरली होती. आता मार्केटाने हे मोठे यश संपादन केले आहे.

मार्केटाने करिअरमध्ये दुसऱ्यांदा ग्रँडस्लॅमची अंतिम फेरी गाठली होती. तिने यापूर्वी २०१९ मध्ये फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीचा पल्ला गाठला होता. मात्र, तिला यादरम्यान पराभवाचा सामना करावा लागला होता.